MHAH220001772022

रे.मु.नं. ३३/२०२२
शिवाजी उर्फ शिवम वि. संदिप
राजाराम व इतर

<u>आदेश</u>
(नि.क्र.४२ खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर माफ होवून मिळणेकामी दाखल केला आहे.

२. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द वाटप, जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर या दि. ०६/०९/२०२१ रोजी मयत झालेल्या आहेत. वादीची आई सारीका संदिप सायकर हिचा प्रतिवादी क्र. १ संदिप याचेशी कायदेशीर घटस्फोट झालेला असल्याने ती प्रतिवादी क्र. १ यांचेसोबत राहत नसल्याने प्रतिवादी क्र. २ ही मयत झाल्याचे सारिका संदिप सायकर हिस समजले नसल्यामुळे व मयताची कागदपत्रे वादीस वेळेत न मिळाल्यामुळे सदरची दुरुस्ती वादीस मुदतीत करता आली नाही. सदर मयत प्रतिवादी क्र. २ हिस एक मुलगा प्रतिवादी क्र. १ व दोन मुली प्रतिवादी क्र. ३ व ४ हेच कायदेशीर वारस आहेत. वादीने प्रतिवादी क्र. २ हिचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशीर माफ करुन मिळावा अशी विनंती केली आहे. प्र.वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे देऊन आक्षेप घेतला आहे व असे कथन केले आहे की, अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

४. वादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर या दि. ०६/०९/२०२१ रोजी मयत झाल्या बद्दल ग्रामपंचायत कार्यालय, आखोणी, ता. कर्जत, जि. अहमदनगर यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. प्र.वादी यांनी अर्जास स्पष्टीकरणासह आक्षेप नोंदवला नाही. अर्जदाराने त्याच्या अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले आहे. मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारसदार अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. वादीने विलंब माफीचा अर्ज उशीराने दाखल केलेला आहे त्यामुळे वादीने प्र.वादीला झालेल्या नुकसानाबद्दल खर्चाची रक्कम देणे आवश्यक आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) वादीचा नि.क्र.४२ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे. वादीला वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येत असून त्याबद्दल वादीने आक्षेप घेणारे प्र.वादीस रक्कम रु.१,०००/- (एक हजार रुपये मात्र) खर्च म्हणून द्यावेत.

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.10.28 16:56:46 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :२८/१०/२०२५.